International Recognized Double-Blind Peer Reviewed Multidisciplinary Research Journal
Indian Streams Research Journal
ISSN 2230-7850 Impact Factor : 3.1560(UIF)
Volume - 5 | Issue - 4 | May - 2015 Available online at www.lbp.world

# वारकऱ्यांना ज्ञानामृत पाजणारा राष्ट्रसंत तुकडोजी महाराज

प्रा. गोपीचंद या. कठाणे
आर बी व्यास कला वाणिज्य महाविद्यालय कोंढाळी, जि. नागपूर.



## प्रस्तावना :-

मध्ययुगीन महाराष्ट्रात प्रचलित असलेल्या पंथांपैकी वारकरी संप्रदाय आजवर अखंडितपणे चालू असलेली एक धार्मिक आणि सामाजिक चळवळ आहे. तिचे परिणाम साहित्य व समाजजीवन या दोन्हीवरही झालेले आहेत. ही चळवळ संस्कृती संरक्षण आणि समाज प्रबोधन या दोघांशी निगडित आहे. ' पांडुरंग' या संप्रदायाचे आराध्य दैवत असले तरी इतर देवदेवतांचा अधिक्षेप या संप्रदायाने कधीच केलेला नाही. जनता जनार्दन आणि विठ्ठलाच्या रूपात सर्व देवता पाहण्याची व्यापक दृष्टी या संप्रदायाने महाराष्ट्रला दिलेली आहे. या दृष्टिकोनामुळे भिन्न कुलपरंपरा विठ्ठल भक्तीच्या आड येऊ शकली नाही. या व्यापक अधिष्ठानामुळे या संप्रदायाला वर्णभेदावर मात करता आली.

युगसापेक्ष परिवर्तन हा भारतीय संस्कृतीचा एक प्रकृतिधर्म आहे. या प्रकृतिधर्माचे दर्शन वारकरी संप्रदायाच्या इतिहासातही घडते. 'आम्हा सापडले वर्म | करू भागवतधर्म' ही संत नामदेवाची घोषणा या प्रकृतिधर्माची निदर्शक आहे.

वारकरी संप्रदायाने सामाजिक आणि आध्यात्मिक समता, मानवता, सद्गुरू आणि सदाचाराची शिकवण समाजाला दिर्ल आणि म्हणूनच अनेक आपत्ती आल्या असतानाही हा समाज अखंड राहिला, जिवंत राहिला. त्याचे वैचारिक आणि आध्यात्मिक अधिष्ठान कायम राहिले. संत साहित्याने वारकरी संप्रदायाचे कार्य खरोखरीच अलौकिक आणि अनन्यसाधारणे ज्ञानदेवांची ज्ञानेश्वरी, नामदेवांची अभंगगाथा, तुकारामांचे अभंग, समर्थांचा दासबोध, नाथांचे भावार्थरामायण यासोबतच वारकऱ्यांचे जीवन उज्ज्वल करणारी ग्रामगीता हे ग्रंथ केवळ चिंतनाचे अथवा अभ्यासाचे विषय नाही तर ते जीवनाचे आधारस्तंभ झाले

त्यातूनच आध्यात्मिक आणि सामाजिक अभिसरणाची, समाजप्रबोधनाची व समाज परिवर्तनाची प्रक्रिया गतिमान झाली. कोणत्याही ज्ञानाला जेव्हा अध्यात्माची आणि शाश्वत मूल्यची जोड मिळते तेव्हा ते ज्ञान विधायक आणि मानवी कल्याणाला उपकारक ठरते.

आध्यात्मिक मानवधर्म हे संतांचे अवतार कार्य आहे. राष्ट्रसंत तुकडोजी महाराज या संत परंपरेचे वारसदार ठरतात. भागवत धर्माची परंपरा तर त्यांनी उत्कृष्टरीत्या चालविली, परंतु त्याबरोबरच त्यांनी त्याला राष्ट्रधर्माचीही जोड दिली आहे. हे त्यांच्या जीवनदर्शनाचे सर्वात महत्त्वाचे वैशिष्ट्य होय. साधुता, मानवता, राष्ट्रीयता या तिन्हींचा संगम म्हणजेच राष्ट्रसंत तुकडोजी महाराज. देवापासून ते गावापर्यंत, रावापासून ते रंकापर्यंत आणि मनःशांतीपासून ते जनशांतीपर्यंत महाराजांच्या जीवनाच्या कार्याची झेप होती. राष्ट्रसंतांच्या ग्रामगीता, राष्ट्रधर्माची पदे व उत्कृष्ट भक्तिभावाची गीते आदी सर्वच साहित्यातून वाक्गंगा प्रवाहित होत राहिली आहे.

राष्ट्रसंतांच्या अभंगात ईश्वरप्राप्तीची आर्तता, भावभक्तीची उत्कृष्टता, साधकाची नम्रता आणि देवाशी अनन्य शरणता वाचकांना प्रतीत होते. ग्रामगीता महाराजांच्या कर्मयोगाचा आविष्कार आहे, तर अभंगगाथा हा महाराजांच्या भक्तीयोगाचा आविष्कार आहे.

प्रारब्धाचा बोध सुखे भोगेन जगी| सुख दुःखे भोग त्यागा पाहे निःसंगी ||
गोत्र दिवाळीचे साथी | नाही तर दूर होती||
तुकड्या म्हणे खरा साथ | माझा एक सद्गुरुनाथ||
मरणी हासणे मरणा पाहणे |साधून घे जेणे साध्य होय ||
तुकड्यादास म्हणे देव मागे प्रेम | आणिकांचे काम नाही त्यासी ||
वैष्णव तो एक पीडा नेदी कोणा |उपकार विना घास न घे ||
सर्व हरिदास जे दिसे डोळ्यास | तोडी आशा पाश अहंकार ||
तनु मने धने सदा करी सेवा |अंतरीचे देवा दृढवोनी||
तुकड्यादास म्हणे असूनी संसारी | जीवभाव दुरी करुनी राहे||

**राष्ट्रसंतांचे काव्य :**

विसाव्या शतकातील मराठी, हिंदी वाङ्मयात राष्ट्रसंत श्री तुकडोजी महाराज यांचे गद्य-पद्य वाङ्मय संत ज्ञानेश्वरांच्या वाङ्मयाप्रमाणे चमकून गेले. महाराजांच्या गंगाप्रवाहित वाक्यरचनेने सुमारे सत्तर वर्ष भारतीय भाविकांना वेड लावलेले होते आणि आजही त्यांची हजारो भजने भाविकांच्या वैखरीतून नादब्रह्माच्या लहरीत निघत आहेत. वंदनीय महाराजांचे हिंदी आणि मराठी या दोन्ही भाषांवर प्रभुत्व होतं. हिंदी वाङ्मयात महाराजांनी ओवी, आर्या, दिंडी, लावणी, पोवाडे, श्लोक, कविता, भजन, अभंग रचलेले आहेत. त्यांच्या काव्यगंगेने पद्य वाङ्मयातील बहुतांश प्रकार हाताळलेले आहे, असे अभ्यासकाला दिसून येईल त्यांच्या काव्यगंगेच्या काठावर विविध आणि अलंकाररुपी तीर्थस्थाने आहेत आणि या तीर्थस्थानातील पवित्र मंदिरात विविध रसांची रेलचेल आहे. परतत्त्वाशी एकरूप होऊन नादमाधुर्याच्या गाभाऱ्यात घुमत आहे. वंदनीय महाराजांच्या पद्य वाङ्मयात विविधता आणि विपुलता आहे; परंतु त्यांचे काव्य कधी सगुणाची खोळ घेऊन व्यक्तिरूपाने नांदत आहे, तर कधी नादबिंदूकलातील राहून निर्विकल्पता दर्शवीत आहे, तर कधी त्यांची वाणी अगोचर अशा आत्मरूपात विचरत आहे तर कधी विराट विश्वरूपाकडे धावत आहे असा भास होतो. त्यांच्या शब्दाशब्दांतून सद्धर्म, सद्विचार आणि सद्प्रवृत्तीचे धागे विणले जाते. विश्वयोग, विश्वात्मक देव आणि विश्वात्मक भाव त्यातून प्रकट होत जातो.

**अभंग रचनेचा उद्देश :**

वं. महाराजांनी अभंगगाथेतील अभंग लिहिले, त्यामागे दोन उद्देश असावेत. पहिला उद्देश म्हणजे त्यांना सगुण तत्त्वाशी सुसंवाद म्हणजेच सुख संवाद साधायचा होता.

चित्त लावावे साधने मन गुंतवावे लेखणी |
देह पडावा भजनी सेवा करावी जिवांनी |
म्हणून उपक्रम केला तुझं गाईले विठ्ठला|
तुकड्या म्हणे नाही आस उपदेशावया कोणास ||

त्यांचा दुसरा उद्देश म्हणजे त्यांना समाज जीवनात प्रबोधनाचे कार्य करायचे होते. वैयक्तिक जीवनापासून आरंभ करून विश्वात्मक जीवनापर्यंत पोहोचण्याचे त्यांचे ध्येय होते. त्यांना वस्तूंच्या सद्गुरु उपासनेपासून निघून उपासनेचे उच्च शिखर गाठायचे होते.

**राष्ट्रसंतांची रसिकता :**

वं. महाराजांच्या अभंग काव्यात विविध रस आढळतात. वीर रस, भयानक रस, शांत रस, रौद्र रस आणि भक्ती रस यांची अनेक उदाहरणे वंदनीय महाराजांच्या अभंगात दिसून येतात.

एका एकांती विठ्ठला जीव भेटाया भुकेला |
विवेकाचा तो चाबूक मारी कधी ठेवी धाक ||
चणे लोखंडाचे खावे तरीच ब्रह्मानंद पहावे |
गळा भुजंगाचे हार अंगी शोभे व्याघ्रंबर ||
प्रचंड पर्वताचे कडे गर्द वृक्षाचे पांडू के |
चला चला रे दर्शना जाऊ देवाचे चरणा ||
तुकड्या म्हणे भक्तीरस आम्हा तुझी ब्रह्म रस ||
नाहीतरी सिंधुळीच्या व्यर्थ बरळसी वाचा|
कृष्ण कृष्ण आठवते कृष्णमय होय कांती ||

**राष्ट्रसंतांचे परतत्व :**

राष्ट्रसंतांचे काव्य शब्दाला शब्द जोडलेले काव्य नाही. ती प्रासादिक वाणी आहे. या हृदयीचे त्या हृदयी घातले, असे परतत्व स्पर्शी काव्य आहे. त्यांना भगवंतांचे दर्शन अणुरेणूतही होत असते. जिकडे पहावे तिकडे हरी| हरी दाटलांबरी| नरणारी भेद गेला| एक हरीच साठला| आत्मा अखंड अमर| तया नाही हा व्यवहार||

राष्ट्रसंत देहातीत झालेले महापुरुष होते. त्याचे प्रत्यंतर अनेकांना अनेक ठिकाणी आलेले होते. राष्ट्रसंतांच्या परतत्त्व स्पर्शाविषयी एवढेच म्हणावेसे वाटते की, त्यांना आत्मानुभूतीचा अमृतकुंभ मिळालेला आहे. त्या अमृताची ओळख ते करून देतात. एवढे मात्र खरे की त्यांची अभंगवाणी वाचताना अथवा गाताना परतत्त्वाचा भावतरंग निर्माण होतो.

**समाज प्रबोधन :**

राष्ट्रसंत तुकडोजी विसाव्या शतकातील अति श्रेष्ठ समाज प्रबोधनकार होते प्रत्यक्षात प्रबोधनासाठीच त्यांचा अवतार होता असे वाटायला लागते वंदनीय महाराजांच्या इतर ग्रंथांप्रमाणे त्यांच्या अभंग वाणीतही समाज शिक्षणाचे पाठ आहेत त्यांच्या अभंग वाणी केवळ सगुण भक्ती निर्गुण भक्ती अध्यात्म जीवनच नाही तर त्यात समूह जनसमुहाला सावध करण्याचे जागृत करण्याची ही प्रशिक्षण क्षमता आहे आरंभीच्या जीवनात वंदनीय महाराजांनी सगुन बघती रानावनात हिंडून केली मंदिरात बसून पूजाअर्चा केली याची साक्ष त्यांनीच ग्रंथराज ग्रामगीतेच्या आत्मानुभव या सदोतिसाव्या अध्यायात दिलेली आहे. प्रस्तुत अभंगाच्या पाना,पानांतूनही त्यांचे प्रतिध्वनी उमटत असते तथापि त्यांची द्दष्टी साफ होती त्यांनीच अभंगात म्हटले आहे

आधी अध्यात्म जीवन पुढे समाजकारण
आधी आज जरोनी घ्यावे मगच जनलोका सांगावे
आधी मरावे मरणी मग व्हावे सकळ ज्ञान
आधी भक्तीने रंगावे मग जना नाचवावे
तुकड्या म्हणे अनुभव लोक चहाताती सर्व
ब्रह्मज्ञानाची पेरणी नोहे बोलक्या तोंडानी
तेथे हवा अनुभव साक्षीत्वाचा अंतर्भाव
कोणाची अधिकारा कोण्या सांगावे विचारा
तुकड्या म्हणे पात्रापात्र निरखुणी द्यावा लागे मंत्र

राष्ट्रसंतांची समाज प्रबोधन सरिता अखेरच्या श्वासापर्यंत सुरूच होती सगुनाकडून निर्गुणाकडे परत निर्गुणांकडून सगुनाकडे द्वारी झोपडीत शिकलो असे मनसेवा कार्यरत होती समाज परिवर्तन देश काल स्थिती पाहून करणे आवश्यक आहे याची साक्ष त्यांच्या अभंग गातेत आणि इतरही ग्रंथातून दिसून येते राष्ट्रसंतांच्या जीवनात जे प्रचंड रचनात्मक कार्य घडून आली त्यांची बीज या अभंग गाथेमध्ये दिसून येतात

यादव काळाच्या अखेरीस महाराष्ट्रात महानुभाव व वारकरी या दोन संपादयाचे विशेष प्रबंध होते. त्यापैकी वारकरी संप्रदाय या समाजात अधिक लोकप्रिय झाला. वारकरी संप्रदायाचा परामर्श संत बहिणाबाईंनी एका अभंगात नेमकेपणाने घेतलेला आहे.

"संतकृपा जाली । इमारत फळा आली ।
ज्ञानदेवे रचिला पाया । उभारिले देवालया ॥
नामा तयाचा किंकर । तेणे रचिले ते आवार ।
जनार्दन एकनाथ । खांब दिधला भागवत ।
तुका झालासे कळस । भजन करा सावकाश ॥
बहिणी म्हणे फडकती ध्वजा । निरूपण केले ओजा ॥

वारकरी पंथ सामान्यांसाठी निघालेला भक्ती संप्रदाय आहे वारकऱ्यांची भक्ती प्रवृत्ती पण आहे या पंथांनी मुख्यमार्गाचा प्रचार केला वारकरी पंथाने ज्ञानाचे महत्त्व मान्य करून भक्तीला अग्रस्थान दिले तिला प्रवृत्ती पर वळण लावले व नाम संकेतनासारखे सुकर साधन लोकांपुढे ठेवले अध्यात्म मंदिराचे प्रवेशद्वार जास्तीत जास्त रुंद असावे अशी त्यांची भावना होती चोखामेळा गोरा कुंभार सावता माळी हे सर्व गृहस्थाने व कुटुंब वसंत होते ते आपापले व्यवसाय निर्व्हेजपणे करीत होते

लोकांपासून ते कधी खटकून राहिले नाहीत ज्ञानदेव व नामदेव या दोघांच्या प्रभावामुळे भक्ती गंगेचा प्रवाह महाराष्ट्रात अठरापगड जातीमध्ये पोहोचला व एक प्रकारची आध्यात्मिक लोकशाही निर्माण झाली. एकूणच वारकरी पंथ हा सर्व संग्रह काय त्याने संकुचित सांप्रदायिकता बाळगली नाही, प्रतिकांचा आग्रह धरला नाही या पंथात विठ्ठलाचा महिमा अधिक आहे.

## वारकरी संप्रदाय आणि राष्ट्रसंत :

संत ज्ञानेश्वरांनी वारकरी पंथाचा कायापालट घडून आणून महाराष्ट्रात धार्मिक व सामाजिक प्रबोधनाची मुहूर्तमेढ रोवली नामदेवांनी आपल्या भावनात कटतेने श्रद्धा बळाने व समर्पनशीलतेने जातीतील विठ्ठल भक्तांची मने वेधून घेतली आणि तत्कालीन धार्मिक आंदोलनात सामील होण्यास त्यांना प्रवृत्त केले त्यानंतर परधर्मीय राजवटीतील अशांततेच्या व स्थिरतेच्या वातावरणामुळे या कार्यात पुष्कळ खंडा पडला पुढे एक नाथांनी एकंदर कालमान लक्षात घेऊन दूरदर्शीपणाने निर्धाराने कल्पकतेने व सावधानतेने भागवत धर्माच्या चळवळीत चालना दिली तुकाराम रामदासांनी एकनाथांचे जीवन निष्ठेतील एकेका प्रवृत्तीचा स्वतंत्रपणे व साकल्याने पाठपुरावा करून तिचा उत्कर्ष बिंदू गाठला आणि धर्म सुधारण्याचे व लोक जागृतीचे कार्यत्या काळात पूर्ण तेच नेले तुकारामांनी आपल्या आयुष्यात पावलोपाली संघर्ष केला या संघर्षाच्या वाटचालीत सुखदुःखाचे हाल अपेष्टांचे मानापमानांचे अनेक प्रसंग त्यांच्यावर आले व तेच त्यांनी अतिशय तरल आणि संवेदनाशी वृत्तीने आपल्या अभंगातून व्यक्त केले एका अर्थाने तुकारामांचे अभंग म्हणजे त्यांच्या आत्मनिवेदन आहे आत्मकथन आहे व आत्मचिंतनही आहे अंतरीचे धावे स्वभावे बाहेरी असे ते स्वतःच आपले अभंगाचे वर्णन करतात आणि ते सार्थ येईल त्यामुळेच त्यांच्या अभंगातून विचारातील सकसपणा वाणीतील रोखठोकपणा आणि मार्मिक दृष्टांत याच्या अतिशय प्रत्येकाची दर्शन भाविकांना घडते व नकळतपणे भाविकांचे अनुभव विश्व समृद्ध होत जाते या संत महंतांची ऐतिहासिक कामगिरी तर मोठी आहेत पण मराठी जनमानसावरी त्याच्या वाङ्मयाची छाप अजूनही कायम आहे त्यांच्या उद्धारातून बहुजन समाजाला आजही आपल्या उच्च तर अंतप्रेरणाची मनोमन प्रचिती येते.

## निष्कर्ष :

तुकारामानंतर वारकरी संप्रदायात संप्रदायाचा विकास थांबला होता परंतु वारकरी परंपरा आजही चालू असली तरी पुढच्या काळात योगसापक शेतीची जोड वारकरी संप्रदायात प्रासनंद तुकडोजी महाराजांनी मिळवून दिली.

कशाला काशी जातो रे बाबा ! कशाला पंढरी जातो ॥धृ ॥
संत सांगती ते ऐकत नाही इंद्रियाचे ऐकतो ।
कीर्तनी मान डोलवितो परी कोंबडी बकरी खातो ॥ १ ॥

या भजनाच्या द्वारे राष्ट्रसंतांनी लोकांमधल्या भक्तिभावाला जागृत करी त्यांची कान उघाडणी केली आहे. म्हणजेच राष्ट्रसंत तुकडोजी महाराज हे खऱ्या अर्थाने वारकऱ्यांचे कान टोचून त्यांना ज्ञानामृत पाजणारे खरे संत होय.

## संदर्भ सूची :


1. संदर्भ कोचिंग क्लासेस पुणे पृष्ठ क्रमांक १७
2. नसीराबादकर ल.रा. 'प्राचीन मराठी वाङ्मयाचा इतिहास', फडके प्रकाशन, पृष्ठ क्रमांक ६५
3. संपादक रक्षक ज्ञानेश्वर, '१४ वे राष्ट्रसंत तुकडोजी महाराज विचार साहित्य संमेलन, दिनांक २७,२८ सप्टेंबर २०१३, पृ. कृ. २३
4. संपादक सुदाम सावरकर, 'वंदनीय राष्ट्रसंत तुकडोजी महाराज विरचित 'अनुभवामृत अभंग गाथा' श्री बाळासाहेब भारदे यांचा अभिप्राय, श्री गुरुदेव प्रकाशन, गुरुकुंज मोझरी
5. ग्रामगीता जीवन विकास परीक्षा, ग्रामनाथ, श्री गुरुदेव प्रकाशन, गुरुकुंज आश्रम पृ. क्र. ४६
6. वंदनीय राष्ट्रसंत तुकडोजी महाराज विरचित, 'राष्ट्रीय भजनावली' (मराठी), श्री गुरुदेव प्रकाशन, गुरुकुंज आश्रम, पृ.क्र. १
7. वंदनीय राष्ट्रसंत तुकडोजी महाराज विरचित, 'विवेक सरिता,' हिंदी भजनावली, श्री गुरुदेव प्रकाशन, गुरुकुंज आश्रम, जि. अमरावती
8. कित्ता, पृ. क्र. ७६
9. वंदनीय राष्ट्रसंत तुकडोजी महाराज विरचित, 'अनुभवामृत अभंग गाथा', श्री गुरुदेव प्रकाशन, गुरुकुंज आश्रम, जि. अमरावती, पृ.क्र. ११
10. कित्ता, पृ. क्र. १२
11. कित्ता, पृ. क्र. ३३
12. कित्ता, पृ. क्र. १४
13. कित्ता, पृ. क्र. ६
14. कित्ता, पृ. क्र. २७
15. वंदनीय राष्ट्रसंत तुकडोजी महाराज विरचित, 'लोकप्रिय निवडक भजने', अनुभवामृत अभंग गाथा, श्री गुरुदेव प्रकाशन, गुरुकुंज मोझरी, पृ. क्र.३६५
16. कित्ता, पृ. क्र.३६६
17. कित्ता, पृ. क्र.१४
18. वंदनीय राष्ट्रसंत तुकडोजी महाराज विरचित, 'ग्रामगीता' अध्याय क्रमांक १, पृ. क्र. ८
19. वं. राष्ट्रसंत तुकडोजी महाराज विरचित, 'अनुभवामृत अभंग गाथा', श्री गुरुदेव प्रकाशन, गुरुकुंज आश्रम, जि. अमरावती.